# प्रेसनोट

जा.क्र. २४५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस उप अधिक्षक कार्यालय,भंडारा
दिनांक :– ११/०५/२०१८

## '' मोटार सायकल न दिल्यावरून जिवानिशी ठार करण्याचा प्रयेत्न करणाऱ्या आरोपीस सात वर्ष सश्रम कारावास व द्रव्यदंडाची शिक्षा''

पोलीस ठाणे वरठी अंतर्गत आरोपी नामे भगत सहादेव मांझी, वय ३२ वर्ष, रा. नागफेना, ता. कांटाभांझी, जि. बालांगीर, राज्य उडीसा याने तक्रारदार ओप्रकाश मोहनलाल दहीया रा. जोधपुर राज्य राजस्थान यास त्याचे हेल्पर यास रेल्वे स्टेशन वरठी येथे सोडण्याकरीता मोटार सायकल न दिल्याचे कारणावरून तक्रारदार यास जिवे ठार मारण्याचे उद्देशाने याचे मानेवर व गळयावर घरगुती भाजी कापण्याचे चाकुणे वार करून गंभिर जख्मी केल्याचे आरोप सिध्द झाल्याने आज दिनांक ११.०५.२०१८ रोजी जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा चे अतिरीक्त सत्र न्यायाधिश वर्ग २ श्री. सचिन बी. भंसाली सा. यांनी आरोपीस सात वर्ष सश्रम कारावास व २०००/– रूपये द्रव्यंडाची शिक्षा सुनावली.

याबाबत अधिक माहिती अशी की, तक्रारदार ओप्रकाश मोहनलाल दहीया, वय ४९ वर्ष रा. ओशियान जिल्हा जोधपुर राज्य राजस्थान हे सनफ्लॅग कंपनी वरठी येथे जे.के. ट्रान्सपोर्ट येथे सुपरवायझर म्हणुन काम करीत असुन वरठी येथे ड्रायव्हर भगत मांझी व नवरतन नैताम असे किरायाने राहत होते. दिनांक २९.०४.२०१६ ला ८.०० वा. सुमारास भगत मांझी यांचा हेल्पर सिताराम नाईक हा तक्रारदार याचे रूमवर जेवण करण्याकरीता आला. जेवन करून सिताराम नाईक यास गावी जात असल्याने भगत मांझी याने नाईक यास रेल्वे स्टेशन वरठी येथे सोडुन देण्याकरीता भगत मांझी याने तक्रारदार याची गाडी मागीतली परंतु तक्रारदार याने मांझी हा दारू पिलेला असल्याने गाडी दिण्यास नकार देवुन रेल्वे स्टेशनवर सोडुन देतो असे बोलुन अंदाजे १०.०० वा. दरम्यान तिघेही रेल्वे स्टेशन वरठी येथे जाण्यास मोटार सायकलने निघाले. काही अंतर गेल्यानंतर मोटार सायकलवर मागे बसलेला भगत मांझी याने हेल्पर यास रेल्वे स्टेशनवर सोडण्याकरीता मोटार सायकल दिली नाही म्हणुन तक्रारदार यास जिवे ठार मारण्याचे उद्देशाने याचे मानेवर व गळयावर घरगुती भाजी कापण्याचे चाकुने वार केले. तक्रारदार हा गंभिर जख्मी झाल्याने उपचाराकरीता सामान्य रूग्णालय भंडारा येथे उपचारा करीता नेण्यात आले. सपोनि कदम यांनी जख्मी यांचे घटणेबाबत सविस्तर बयाण नोंदवुन, आरोपी भगत सहादेव मांझी याचे विरूध्द पो.स्टे वरठी येथे अप.क्र. ४४/१६ कलम ३०७ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयाचा प्राथमिक तपास सहा. पोलीस निरीक्षक शरद कदम यांनी तपास करून साक्षपुरावा गोळा केला. गुन्हयातील आरोपीचा शोध केला मिळुन आला नाही. नंतर गुन्हयाचा तपास पोउपनि सागर कारंडे यांचे कडे सोपविण्यात आला. पोउपनि कारंडे व रायटर पो.हवा. नितीन शिवणकर/१३५ यांनी आरोपीस अटक करण्याकरीता योग्य मुखबिर लावुन नागफेना, ता. कांटाभांझी, जि. बालांगीर, राज्य उडीसा येथे जावुन आरोपीस गुन्हा घडल्याचे ५ महिण्यानंतर दिनांक १७.१०.२०१६ रोजी अटक करून आरोपी विरुध्द योग्य व सबळ पुरावे मिळुन आल्याने दोषारोप पत्र जिल्हा व सत्र न्यायालय भंडारा येथे दाखल केले. सदर आरोपपत्रास केस क्र. ९/१७ अन्वये सुनावणी करीता ठेवण्यात आले.

सदर गुन्हयाची सुनावणी अतिरीक्त **सत्र न्यायाधिश श्री. सचिन बी. भंसाली सा.** यांचे न्यायालयात चालली गुन्हयात सरकार पक्षातर्फे **ॲडव्होकेट श्री. प्रमोद के. भुजाडे, सहा. सरकारी अभियोक्ता**, सत्र न्यायालय भंडारा यांनी योग्य बाजु मांडुन साक्षदार तपासले. आज दिनांक ११.०५.२०१८ रोजी गुन्हयाचे स्वरूप व गंभिरता लक्षात घेवुन **आरोपी नामे भगत सहादेव मांझी, वय ३२ वर्ष** याचे विरूध्द दोषसिध्द झाल्याने कलम **३०७ भादवि सात वर्ष सश्रम कारावास व २०००/-- रूपये दंड, दंड न भरल्यास १ महिणा सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली.** सदर गुन्हयात पोलीस निरीक्षक, सुरेश ढोबळे, ठाणेदार पोलीस ठाणे वरठी यांचे मार्गदर्शनात पोलीस हवालदार, सुकरू वलके/६३० यांनी योग्य पैरवी अधिकारी म्हणुन कामकाज केले.

11.5.18

(डी.डब्लयु मंडलवार)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
दुरध्वनी क्र.८८८८९६०५६०

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत: संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता